1) श्री. .....
वय- ....., व्यवसाय- नोकरी,
PAN-

2) सौ. .....
वय- ....., व्यवसाय- नोकरी,
PAN-

दोघेही रा. .....
.....
.....
नाशिक.

...लिहून घेणार

यांसी...

शिवसाई एंटरप्राईजेस, भागीदारी फर्म
PAN- ADTFS 7902 B
तर्फे भागीदार
श्री. भरतभाई लालजीभाई गाजीपरा
वय- 46, व्यवसाय- व्यापार,
PAN- ABCPG 0511 B
रा. प्लॉट नंबर 18, अश्विन सेक्टर,
सिडको, नाशिक-422009.

...लिहून देणार/ प्रमोटर

कारणे बांधीव फ्लॅट विक्रीचा करारनामा लिहून देतो ऐसा जे की:-

(प्रस्तुतच्या दस्तात यापुढे लिहून देणार यांचा उल्लेख **"आम्ही/आमचे/आम्हाला/लिहून देणार"** व लिहून घेणार यांचा उल्लेख **"तुम्ही/तुमचे/तुम्हाला/लिहून घेणार"** असा केलेला आहे. या संज्ञामध्ये या प्रत्येकाचे वंशवारस, कुटूंबीय, प्रतिनिधी, मुखत्यार, इतर भागीदार व त्यांचे तर्फे हक्क सांगणारे हरएक घटकाचा समावेश आहे.)

1) **मिळकतीचे वर्णन :-**

तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पेकी, रजिष्ट्रेशन जिल्हा नाशिक व सबरजिष्ट्रेशन तालुका नाशिक पेकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील रहिवासी विभागातील **मौजे पाथर्डी** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **सर्व्हे नंबर 230/3** यांसी **प्लॉट नंबर 23 व 24** यांसी **एकुण क्षेत्र 715.35 चोरस मिटर्स** यापैकी नाशिक महानगरपालिका यांचे रोडचे 59.32 चौरस मिटर्स क्षेत्र वजा जाता ऊर्वरित **656.03 चोरस मिटर्स** या क्षेत्राची मिलकत (सिटी सर्व्हे नंबर ..... सिटी सर्व्हे प्रमाणे क्षेत्र ..... चौरस मिटर्स) यांसी चतुःसिमा येणेप्रमाणे...

ले-आऊटप्रमाणे **सिटी सर्व्हे प्रमाणे**

पुर्वेस :- कॉलनी रोड
पश्चिमेस :- कॉलनी रोड
दक्षिणेस :- मनपा ओपन स्पेस
उत्तरेस :- कॉलनी रोड

येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत जल, तरु, काष्ट, पाषाण, निधि, निक्षेप, तदंगभुत वस्तुंसह, जाणेयेणेचे वागवहिवाटीचे, ओपनस्पेस, रस्ते वापरणेचे हक्कांसह दरोवरस्त मिळकत.

2) **प्रस्तुतच्या करारनाम्याचा विषय असलेल्या फ्लॅट/सदनिका मिळकतीचे वर्णन :-**

वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर मंजूर इमारत नकाशान्वये बांधकाम सुरु केलेल्या **"ओमशांती अपार्टमेंट बी"** या इमारतीतील ..... मजल्यावरील **फ्लॅट/सदनिका नंबर** ..... (1 बेड, हॉल, किचन, टॉयलेट यांसी **बाल्कनी सह कार्पेट क्षेत्र** ..... **चौरस मिटर्स** ही मिळकत यांसी चतुःसिमा येणेप्रमाणे..

पुर्वेस :-
पश्चिमेस :-
दक्षिणेस :-
उत्तरेस :-

Scanned by CamScanner